# वाहरू सोनावणे यांच्या कवितेतील जीवन जाणीवा

**प्रा.डॉ.अमर कांबळे**

मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

मु.पो. /तालुका–हातकणंगले,जि.कोल्हापूर , महाराष्ट्र 416109

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यातील आदिम जीवन जाणीवांचे संचित घेवून उमटलेले शब्दरूप म्हणजे वाहरू सोनावणे यांच्या कविता होय. आदिवासी साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व, विद्रोही सांस्कृतिक चळवळ गतीमान करण्यात वाहरू सोनावणे यांचे मोठे योगदान आहे. दलित,वंचित, कष्टकरी जनतेचे किंबहुना सर्वहारा समाजाचे प्रतिबींब म्हणजेच वाहरू सोनावणे यांच्या कविता होय. त्यांचा 'गोधड' हा कवितासंग्रह 1987 मध्ये प्रकाशीत झाला आणि प्रस्थापीत साहित्याला आदिम जीवनानुभव कसे असतात याचे खरे वास्तवदर्शी स्वरूप समजून घेता आले . गोधडकार वाहरू यांचा 'रोडाली' हा दूसरा कवितासंग्रह 2014 साली प्रकाशीत झाला. संपूर्ण आयुष्य आदिवासी तसेच सर्वच शोषितांच्या सर्वहारा समाजाच्या चळवळीला समर्पित असणारे वाहरू सोनावणे यांची कविता आदिवासी समाजाला प्रेरणा देणारी आहे.

**कीवर्ड : गोधड , रोडाली ,वाहरू सोनावणे, आदिवासी ,भिलोरी**

**विषय विवेचनः**

शहादा,नंदूरबार सारख्या दुर्गम भागात आदिवासी भिल्ल समाजात जन्मलेले वाहरू सोनावणे शोषितांचाए उपेक्षितांचा आवाज आपल्या कवीतेतून प्रखरतेने व्यक्त करतात. आदिवासींच्या अस्तित्वासाठी अस्मितेसाठी रचनात्मक चोकचळवळ त्यांनी आपल्या कवितेतून उभी केली आहे. आदिम समाजाला त्यांच्या अस्तित्वासह नाकाराणा–या व्यवस्थेला छेदणारी कविता त्यांनी लिहिली.त्यात निव्वळ वेदना नव्हत्या दुखाचे कष्टाचे चित्रण नव्हते तर व्यवस्थापरिवर्तनाचा प्रस्थापितांना त्यांच्या साहित्यासह नाकारून नवी निकोप साहित्य चळवळ निर्माण करण्याचा आशावाद आणि विश्वास त्यांच्या कवितेत असलेला दिसतो. वास्तव जीवनाला त्याच्या दाहकतेला तितक्याच तीव्रतेने कवेत घेणारा कवी म्हणजे वाहरू सोनावणे होय .त्यांची कविता ही चळवळीची , प्रबोधनाची कविता आहे. गोधड किंवा रोडाली काव्यसंग्रहातील कविता या निव्वळ आदिवासी समाजजीवनाला व्यक्त करीत नाहीत तर त्या सर्वहारा समाजाचे दुःखितांचे,शोषितांचे कष्टक–यांचे व्यथा वेदना मांडतात. गोधड ही व्यवस्था आहे. पिचलेल्या लोकांची आणि त्यांच्या अन्याय अत्याचाराचीत जीवनाची दुःखाच्या अश्रुंची. ती गोधड आता बदलयाची वेळ आली आहे. ही शोषनव्यवस्था आता बदलण्याची गरज आहे असे कवीला वाटते. कवी पिढयांन पिढया ज्या गुलामीत खपल्या त्या जीवनाला नवा आशावाद देत आहे. व्यवस्थापरिवर्तनाचे अस्त्र होवून वाहरूंची कविता प्रकटताना दिसते. या कवितेत क्रांतीचा, परिवर्तनाचा प्रबोधनाचा विचार भेटतो.समतेच्या मानवतेच्या बंधुत्वाच्या विचारांचा पुरस्कार करणारी कविता वाहरूंची असलेली दिसते.

**रोजच दुःख रोज विसरतं जावं**
**उद्याचं दुःख भोगण्यासाठी**

आदिम समाजाच्या हजोरा पिढया या अंधकरात पिचल्या पण कवीला या जगण्याचा त्रास होतोय असे किती दिवस चालणार हे बदलयाला हवे, त्याविरूध्द पेटुन उठायला हवे असे कविला वाटते कवी माणुसकीचा भुकेला आहे .आदिवासीही माणसेच आहेत त्यांनाही समतेची वागणुक मिळावी ही त्याची साधी अपेक्षा आहे. प्रत्यक्ष आदिवासी समाजाची होणारी घुसमट व्यक्त करणारी कविता आहे.

**आमचेच दु:ख आम्हालाच सांगत राहिले एआमचे दु:ख कधी त्यांचे झालेच नाही**
**आम्हाला कधी स्टेजवर बोलावलेच नाही, आम्ही कधी स्टेजवर कधी गेलोच नाही**

दलित शोषित समाजाला न्याय हक्क अधिकार दिला नाही प्रसंगी तो गोठवण्याचा सातत्याने प्रयत्न केले जातात.आजही तीच परिस्थिती आहे याची कविला चिड आहे दृम्हणूनच कवी माणुसकीची लढाई लढायला सज्ज आहे यामध्ये त्याचे बरे वाईट होण्याची शक्यता आहे.इतिहासात अशा व्यवस्थेविरूध्द उठणारे अवाज मारून टाकण्यात आले आहेत तरीही कवी म्हणतो,

**मरणाच्या धाकाने असे किती दिवस लपत फिरू**
**जीव असेपर्यंत माणुसकीची लढाई तर लढावीच लागेल**

जीवनसंघर्ष अटळ आहे पण तो केल्याशिवाय समता मानवता नांदणार नाही न्याय मिळणार नाही म्हणून एक ठाम भूमिका घेताना वाहरू सोनावणे याठिकाणी दिसतात. आदिवासी समाजजीवनाच्या व्यथा आणि वेदना व्यक्त करताना कवी त्याच्या परिस्थितीवर परखडपणे व्यक्त होतो.

**आमच्या जमिनीवर आम्हीच गुन्हेगार**
**कायद्याचे बंधन आले,**
**जमिनीच्या तुकडयावर आदिवासींना खुष केले**
**पहाड पर्वत नदी नाले जंगल,सारे हातातून गेले**

आदिवासी जंगलचा राजा निसर्गावर प्रेम करणारा निसर्गावलंबी जीवन जगणारा तोच आज भयान बेघर जीवन जगताना कवी पाहतो त्यावेळी त्यांच्या या आजच्या परिस्थिला तो निर्भिडपणे व्यक्त करतो. आदिवासींची फसवणुक होतीय .विकासाच्या नावावर तर कधी कायद्याचे भय त्यांना दाखवले जाते त्यांचे पिढयांपिढयाच जगण्याचे साधनच हिसकावून घेतल्यानंतर त्यांच्यासमोर मोलमजुरीशिवाय पर्याय नाही त्याठिकाणीही त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेतला जातो दृम्हणूणच कवी म्हणतो

**एकलव्या फसवणुकीचा इतिहास सुरूच आहे**
**कलम करून आदिवासींना वनवासी बनवत आहे**
**हे अन्याय साहणार नाही**
**कितीही आले द्रोणाचार्य तरी अंगठयाचे दान देणार नाही**

आदिवासी समाज परिवर्तनाच्या विचाराने जागे करण्याचे काम कवी वाहरू सोनावणे यांनी केले आहे. त्यांच्यात चेतना स्फुर्ती जागवण्याचे काम ते करीत आहेत.इतिहास त्यांनी समजून घेतला आहे.कतृत्वाला नाकारण्याची आणि संपवण्याची विकृत व्यवस्थेविषयी ते शोषिंतांना जागृत करण्याचा प्रयत्न करीत आहेत.एकलव्यापासून ते बीरसामुंडापर्यंत अनेकांना व्यवस्थेने गीळकृंत केले. आदिवासींना त्यांच्या अस्तित्वासह नाकारले त्याच व्यवस्थेचा बिमोड करून नवी मानवतावादी समेतेची सांविधानिक मूल्यव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी कवी समर्पित असलेला दिसतो. वाहरू नव्या पीढीला क्रांतीबील देतात दुनिया बदलण्याची भाषा ते करतात. यासाठी प्रसंगी हुतात्म आले तरी ते स्वीकारायला सज्ज असलेले दिसतात.

**आगीत चालत जावं लागले तर चालत जावा**
**सु सु गोळया सुटल्या तरी रक्ताचा झेंडा फडकवत जवा**

वाहरू सोनावणे यांच्या कविता हया क्रांतीकारी विचार मांडणा—या कविता आहेत दृत्यामध्ये समाजजीवन जाणिवा आहे. करूणा आहे माणसांविषयीचा जिव्हाळा आहे. माणुसकीच्या मूल्यांचा पुरस्कार ते करतात
म्हणूनच त्यांची कविता ही मानवमुक्तीची कविता वाटते.कवी मानवमुक्तीच्या लढाईला समर्पित असल्याचे दिसते. आदिवासी समजात ,कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांना फार महत्व आहेत्र तीला समान संधी आहे. आदिम स्त्री ही इतरांप्रमाणे शोषिंत व्यवस्थेची बळी आहे दृतिलाही परिवर्तनाची गरज आहे.तीनेही परिवर्तन लढाईत उतरले पाहिजे असे कविला वाटते.म्हणूनच कवी म्हणतो,

**आदिवासी एकता पुरूषांची नाही**
**बायांनीही पुढे यावे**
**आमच्या जीवनावर आमचाचं अधिकार**
**मुक्तीचे गीत गावे**
**आदिवासी स्त्री मुक्ती मानव मुक्ती**

स्त्रियांनी शोषणव्यवस्थेचा भाग बनता कामा नाये. त्या कष्टकरी समाजाचे प्रतिक आहेत. त्यांनाही सत्व आहे ,अस्तित्व आहे. त्यांच्या अस्तित्वासाठी,अस्मितेसाठी त्यांनीच पुढाकार घेतला पाहिजे. स्त्रियांच्या सहभागाशिवाय परिपूर्ण क्रांती शक्य नाही. लोकशाहीचा हक्क अधिकारापासून वंचित असणा—यांनी त्यांच्या हक्क आधिकारासाठी पुढे आलेच पाहिजे ही भूमिका कवीची आहे .

कवी वाहरू सोनावणे हे समातावादी कार्यकर्ते आहेत. त्याच्या प्रगल्भ विचारांची ओळख त्यांच्या कवितेत होते. ते डोगंर द—यातील , आदिम वाडया पाडयातील लोकांच्या न्यायाची भाषा करतात. पण ती मांडणी मर्यादेपलिकडे जाते. ती वैश्विक असते. तीला माणुसपणाचा सुंगध आहे .शहरी ,ग्रामीण दलित आदिवासी, भटके सर्वच वंचित उपेक्षित दुःखी आहेत पण प्रत्येकाच्या दुःखाचे संदर्भ वेगळे आहेत. त्यामुळे त्या प्रश्नांची उत्तरेही वेगळीच शोधावी लागतील. आदिम जीवनातील व्यथा वेदना हया वेगळया आहेत त्यांना दुःखमुक्त करण्यासाठी वेगळयाच वाटा शोधाव्या लागतील असे कवीला वाटते .

वाहरू सोनावणे यांच्या गोधड,रोडाली या दोन्हीही कविता संग्रहातील कविता हया दुःखमुक्तीची भूमिका घेतात. त्या श्रमिकांची, कष्टक—यांची भाषा बोलतात. भारतीय समाजव्यवस्थेतील विषमतेचे ,शोषकांचे साम्राज्य उध्वस्थ करण्याची लोकचळवळ उभी करण्याची क्षमता या कवितेत आहे. समतेचे मानवतेचे बुधुत्वाचे एकुणच मानवी मूल्यांच्या प्रस्थापणाचे स्वप्न पाहताना कवी दिसतो. तो आशावादी आहे परिवर्तनावर त्याचा विश्वास आहे. क्रांती घडणार आणि ती शोषितांनाच घडवावी लागणार या विषयी सजग आहे . हे सत्यात येण्यासाठी रचनात्मक कृती कार्यक्रम त्यांच्याकडे आहे. म्हणूनच आदिवासी समाजाला जागृत करण्याचे सर्वहारा समाजबांधवांसोबत जोडण्याचे कार्य ते करतात. त्यासाठी ते समर्पनाची तयारी दाखवितात त्यामुळे ते एक कृतीशील विचारवंत म्हणून समोर येताना दिसतात.

आदिवासी जीवनसंस्कृती महान आहे त्याचा अभिमान वाहरू सोनावणे यांना आहे. आदिम जीवन तथा सर्वच सर्वहारा शोषितांच्या व्यथा वेदना कवी 'गोधड' आणि 'रोडाली' मधील कवितेच्या माध्यमातून व्यक्त करतात. कवी समताधिष्ठीत मूल्यव्यवस्थेच्या समर्थनार्थ लोकचळवळीत उतरात. त्यामूळेच त्यांच्या कवितेला प्रबोधनाची ,परिवर्तनाची क्रांतीची धार आहे . ती प्रखरपणे प्रकटताना दिसते. त्यांची कविता ही मानवमुक्तीची,माणूसकीची भाषा बोलते, संविधानिकमूल्ये घेवून ती प्रकटते . प्रस्थापित व्यवस्थेशी दोन हात करताना संघर्ष अटळ असल्यामूळे वाहरू सोनावणे यांची कविता विद्रोही रूप घेते. निमुटपणे अन्याय अत्याचार साहणार नाही अशी ठाम भूमिका घेते. संवेदनशील ,सृजनशील भावबंध व्यक्त करतातना ती तीतकीच हळवी आणि प्रेमळपणे व्यक्त होते . हे वाहरू सोनावणे यांच्या कवितेचे आणखीन एक विशेष होय. प्रतिमा, प्रतिके यांचा अलंकारीक हट्टाहास न करता वाहरूंची कविता ही साधेपणाने आणि खरेपणाने प्रकटते त्यामुळेच त्यातील संवेदनांना जिवंतपणा आलेला आहे. त्या कल्पनेचे पंख घेऊन भरारी मारत नाहीत उलट आदिम कष्टकरी समाजाचे वास्तव जीवन जाणीवा व्यक्त करताना दिसतात.

**संदर्भ :**

सोनावण वाहरू , गोधड
सोनावणे वाहरू , रोडाली
तुमराम विनायक , शतकातील आदिवासी कविता
गावीत माहेश्वरी , आदिवासी साहित्य
नागावकर प्रशांत , वाहरू सोनावणे व्यक्तीपासून समष्टीपर्यंतचा सम्यक प्रवास